| Sr.No | Student Name | Placement /Progression to HE | Name of the Employer/HE Institution | Pay Package/Program |
|---|---|---|---|---|
| 1. | KUMBHAR TUSHAR DILIP | Placement | Sarvajanik Aroyag Vibhag | 1,40,000 |

महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा

| | | |
|---|---|---|
| रुग्णालयीन दुरध्वनी क्र.<br>(वैयक्तीक) क्र.<br>कार्यालयीन दुरध्वनी क्र. | ०२०-२९७०००४१/६६<br>०२० - २९७०००७८<br>०२०- २९७०००४३ | **जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय,औंध छावणी,पुणे**-२७ फॅक्स क्र.०२० - २७२८६४५८<br>ई-मेल: csaundhpune@yahoo.co.in |
| **आरोग्य सेवा** | जा.क्र.जिशचिजिरुपु/आस्था/वर्ग-४/कक्ष-३/नियुक्ती आदेश/3६६५-८3/२०२४.<br>दिनांक :- 7 /०३/२०२४ | |

विषय :- कक्षसेवक गट-ड वेतनस्तर एस-१: (१५०००-४७६००) या पदावरील नियुक्ती बाबत...

संदर्भ :- १) आरोग्य सेवा आयुक्तालयाचे दिनांक २८/८/२०२३ रोजी प्रसिध्द जाहिरात.
२) मे.टिसीएस-आयओएन यांचेकडील दिनांक ०२/०२/२०२४ रोजीची प्रसिध्द निवड यादी.
३) मा. सहसंचालक (हि.ह.व ज.रो.), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. ससंआसे/पदभरती/परिक्षा/कागदपत्र पडताळणी/२४१७-२५१५/कक्ष-५२अ/न.क्र./२०२४, दि. ०२/०२/२०२४.
४) दिनांक २१/०२/२०२४ व दिनांक २२/०२/२०२४ रोजीचे समुपदेशन.
५) मा.उपसंचालक,आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांचे आदेश क्र.उसंआसे/आस्था/गट-ड/वर्ग-४/कक्ष-५/भरती प्रक्रिया/१०७३०-३१/२०२४ दिनांक २९/०२/२०२४

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पुणे यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन कक्षसेवक गट- ड, या पदावर वेतनस्तर एस-१: (१५०००-४७६००) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीचे आदेश खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे संपुर्ण नाव | नियुक्तीचा प्रकार | नियुक्ती प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | TUSHAR DILIP KUMBHAR | सरळसेवा | OBC | ग्रामीण रुग्णालय, रुई, जि.पुणे |

सदरचे आदेश खालील अटी व शर्तीचे अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत :-

१) सदर नेमणुकीचे आदेश प्राप्त होताच ८ दिवसांचे आंत आपणांस दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व रुजू अहवाल सर्व संबंधितांना सादर करावा. आपण विहीत कालावधीत हजर न झाल्यास आपण हजर होण्यास इच्छुक नाही, असे गृहीत धरुन आपली नेमणुक रद्द करण्यांत येईल.

२) आपली नेमणुक जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त होणाऱ्या शारीरिकदृष्टया पात्र असल्याच्या आधारावर अवलंबून राहील. सदर प्रमाणपत्राव्दारे आपणांस शासकीय सेवेस अपात्र ठरविल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

३) आपली नियुक्ती ही पोलीस खात्याकडून आपले पुर्व-चारित्र्य व वर्तणूक अहवाल प्राप्त होण्याच्या अधिन राहून करण्यात येत असून, सदर अहवालामध्ये काही आक्षेपार्ह नोंदी आढळल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

४) आपली नियुक्ती सादर केलेल्या नॉन क्रिमिलेअर (एन.सी.एल.) प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधिन राहून देण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र अवैध ठरल्यास आपली सेवा समाप्त/रद्द करण्यात येईल.

५) आपण हिंदी व मराठी भाषा संबंधीच्या नियमावलीनुसार जर आपण या अगोदर उत्तीर्ण झाले नसाल किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर आपणांस एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा विषयाची परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६) आपण उक्त नमुद पदाचा कार्यभार धारण केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधी हा परिविक्षाधीन कालावधी राहील. परिविधाधीन कालावधीत कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा वर्तणूक समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल किंवा परिविक्षाधीन कालावधी नियमानुसार वाढविण्यात येईल.

७) वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, मंत्रालय,मुंबई दिनांक ३१.१०.२००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच उमेदवारांस नविन परिभाषित अंशदान निवृत्तीयोजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) नियम-१९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

८) शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/१२,दि.१.७.२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्र नेमणूक स्विकारताना भरुन देणे बंधनकारक राहील. सदर प्रतिज्ञापत्रातील माहिती खोटी आढळून आल्यास उमेदवाराची नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

९) उमेदवारास राष्ट्रीयत्वाची व गोपनीयतेची शपथ घ्यावी लागेल.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati